# जिल्हाधिकारी (राज्य उत्पादन शुल्क) मुंबई शहर यांचे कार्यालय

जुने जकात घर, तळमजला, शहीद भगतसिंग मार्ग, फोर्ट, मुंबई -२३

**फोन / फॅक्स नं. ०२२२२६६४८०१ Email excise_supdt@mahaonline.gov.in**

**वाचा :- १)** मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिईटी ११२०२०/३१२४/५५/नऊ दि. १९.०३.२०२०
२) मा. जिल्हाधिकारी, मुंबई शहर यांचे आदेश क्र. एफएलआर / सीएलआर ११२०२० / अधी. दि. १३ एप्रिल,२०२०.
३) महाराष्ट्र शासन यांचे क्र. DMU/२०२०/CR.९२/DisM-१, दि. १३ एप्रिल, २०२० व दि. १७ एप्रिल, २०२०चे आदेश.

---

## शुद्धीपत्रक

क्रमांक : एफएलआर /सीएलआर ११२०२०/अधी — मुंबई, दिनांक २० एप्रिल, २०२०

मुंबई शहर जिल्ह्यामध्ये दिवसेंदिवस कोरोना (कोव्हीड-१९) विषाणूचा संसर्ग बाधीत रुग्ण आढळून आल्याचे प्रमाण वाढत असल्याचे दिसून येत आहे. कोरोना (कोव्हीड-१९) या विषाणूचा संसर्ग/ प्रादुर्भाव पसरण्याची शक्यता लक्षात घेता त्यावर तात्काळ नियंत्रण करणे व कोरोना विषाणूचा संसर्ग असल्यास त्या अधिक वाढ होऊ न देता त्यावर प्रतिबंधात्मक उपाययोजना आखणे अत्यंत निकडीचे आहे. यासाठी गर्दीच्या ठिकाणी जाणे, वास्तव्य करणे इत्यादी बाबी टाळणे आवश्यक आहे. त्यानुसार मुंबई शहर जिल्हयातील सर्व किरकोळ मद्य अनुज्ञप्ती दि. ३० एप्रिल, २०२० पर्यंत बंद ठेवण्याबाबत आदेशित करण्यात आले होते.

उक्त प्रमाणे कोरोना (कोव्हीड-१९) विषाणूच्या प्रसाराचे माध्यम पहाता सदर विषाणूची लागण एका संक्रमीत रुग्णाकडून अन्य व्यक्तीस / इसमास त्याच्या संपर्कात आल्याने होण्याची शक्यता विचारात घेता, व भारत सरकार तसेच महाराष्ट्र शासन यांचे वरील वाचा क्र. ३ मधील दि. १७ एप्रिल, २०२० रोजीच्या आदेशानुसार लागू करण्यात आलेल्या लॉकडाऊनचा कालावधी विचारात घेता, मी राजीव निवतकर (भा.प्र.से.) जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी, मुंबई शहर जिल्हा व साथ नियंत्रण कायदा १८९७ च्या तरतुदीनुसार व फौजदारी दंडसंहिता, १९७३ मधील कलम १४४, आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५ व महाराष्ट्र दारुबंदी कायदा १९४९ मधील १४२ अन्वये मला प्राप्त असलेल्या अधिकारानुसार आदेशित करतो की, मुंबई जिल्ह्याच्या हद्दीतील सर्व एफएल-२, एफएल-३, सीएलएफएलटिओडी-३, एफएलबीआर-२, सीएल-३, फॉर्म-ई, ई-२, एफएल-४ (कायमस्वरुपी) / एफएल-४/ए (तात्पुरती), एफएलडब्लु-२ व ताडी टिडी-१ या अनुज्ञप्त्यांचे व्यवहार हे आदेश निर्गमित केल्यापासून पुढे दिनांक ०३ मे, २०२० अखेर पूर्ण दिवस बंद राहतील.

उपरोक्त नमुद केलेल्या दिवशी उक्त किरकोळ मद्य विक्री अनुज्ञप्ती बंद ठेवायच्या आहेत. सदर आदेशाचे उल्लंघन झाल्यास त्याचेविरुद्ध महाराष्ट्र मद्यनिषेध अधिनियम १९४९ तसेच इतर अनुषांगीक कायद्यान्वये व नियमान्वये योग्य ती कठोर कारवाई करण्यात येईल याची संबंधितांनी नोंद घ्यावी.

( राजीव निवतकर )
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

प्रत,

१. मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई
२. मा. विभागीय उपआयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, कोकण विभाग, ठाणे यांना माहितीस्तव सविनय सादर.
३. सर्व निरीक्षक, राज्य उत्पादन शुल्क, मुंबई शहर यांना माहिती व योग्य त्या पुढील कार्यवाहीसाठी अग्रेषित.

त्यांना निर्देशित करण्यात येते की, कोरडया दिवशी त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व अनुज्ञप्त्यां बंद राहतील याची दक्षता घ्यावी. आदेशाचे उल्लंघन करुन जे अनुज्ञप्तीधारक मद्यविक्री करतील त्यांचेविरुद्ध कारवाई करुन अहवाल या कार्यालयास तात्काळ सादर करावा. ठेवण्याचे निर्देश संबंधित अनुज्ञप्तीधारकांना द्यावेत. त्याचप्रमाणे त्यांचे लक्ष सोबत जोडलेल्या मा. आयुक्त, राज्य उत्पादन शुल्क, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. डिईटी ११२०२०/३१२४/५५/नऊ दि. १९.०३.२०२० कडे वेधण्यात येत असून त्याप्रमाणे बेकायदेशी परराज्यातील मद्य, बनावट मद्याची निर्मिती / विक्री / वाहतूक होणार नाही याबाबत दक्षता घ्यावी व त्याअन्वये दिलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करावे.

( राजीव निवतकर )
जिल्हाधिकारी, मुंबई शहर

Scanned by CamScanner